विषय : महाराष्ट्र शासनाने पंतप्रधान प्रकल्पांतर्गत [पीएमजीपी] उपलब्ध असलेल्या रिक्त गाळयांना मागणीनुसार व दिनांक ०४-१२-१९९३ च्या शासन निर्णयातील कालमर्यादेत अंशतः बदल करुण अतिरीक्त गाळयाचे वितरण करणेबाबत.

संदर्भ :- शासन ठराव क्र. RGZSMP -१७८८/७८५/D-V दिनांक ०४-१२-१९९३

परीपत्रक

प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सद्यस्थितीत पी. एम. जी. पी अंतर्गत रिक्त गाळयांचा अहवाल घेतला असता एकुन ३ निवासी गाळे [साधारण १८० चौ. फुट] रिक्त असल्याचे दिसुन येते.

| अ. क्र. | इमारतीचे नाव | विभाग | गाळा क्र. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | अरुणोदय सह. गृह. संस्था | बी-२ | ५२५ | १८० चौ. फुट |
| २ | गोवर्धन सह. गृह. संस्था | जी/ दक्षिण | ५०२ | १८० चौ. फुट |
| ३ | पिंपळेश्वर सह. गृह. संस्था | जी / दक्षिण | २०९ | १८० चौ. फुट |

प्राधिकरण ठराव क्र. ६८२१ दिनांक २४-०१-२०१९ अनुसार गाळे धारकास किमान ३०० चौ. फुटचा गाळा देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या पी. एम. जी. पी. अंतर्गत उपलब्ध असलेले १८० चौ. फुटाचे गाळे वितरणा अभावी तसेच शिल्लक आहेत. म्हाडा कडे उपलब्ध असलेले वरील गाळे वितरण करणे शक्य होत नाही. सदर गाळयांपोटी म्हाडास देखभालीपोटी बराच खर्च करावा लागतो. उपरोक्त रिक्त गाळे मागणी प्रमाणे वितरीत केल्यास म्हाडास आर्थिक लाभ मिळु शकतो व देखभाली पोटीचा खर्च वाचुन म्हाडास दुहेरी लाभ मिळु शकतो.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदारांना अतिरीक्त गाळे वितरीत करताना खालील प्रमाणे पद्धत अंमलात आणावी.

१. अर्जदार मुळ वितरण झालेला गाळेधारक असावा.
२. ज्या इमारतीत मुळ गाळेधारकास वितरण झालेले आहे. त्याच इमारतीत उपलब्ध असलेल्या गाळयासाठी तो पात्र राहील. अन्य इमारतीतील उपलब्ध गाळयांसाठी तो अर्ज करण्यास पात्र राहणार नाही व तो पात्र ठरणार नाही.
३. अर्जदारास मुळ गाळयापोटी आधी अतिरीक्त गाळयाचे वितरण झाले असल्यास तो अर्ज करण्यास पात्र राहणार नाही तसेच शासन निर्णय दिनांक ०४-१२-१९९३ मध्ये नमुद केल्यानुसार पुर्वी वितरीत करण्यात आलेला गाळा व नव्याने वितरीत करण्यात येणा-या गाळयांचे एकत्रीत क्षेत्रफळ ३६०चौ. फुटापेक्षा जास्त असता कामानये तसे झाल्यास सदर अर्जदार पात्र ठरणार नाही.
४. वितरीत करण्यात येणारा गाळा हा फक्त रहिवासी वापरासाठी मर्यादित राहील.
५. नविन अतिरीक्त गाळा वितरीत करण्यापुर्वी पात्र अर्जदारास चालु शिघ्रगणकाच्या दरानुसार एक रक्कमी भरणा केल्यानुसार व पुर्वी त्याची थकबाकी असल्यास त्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्यास वितरण करण्यात येईल.
६. मुळ गाळेधारक हयात नसल्यास त्याच्या वारसदारांनी वारसाहक्क प्रमाणपत्र सादर केल्यास त्याच्या अर्जाचा वितरणासाठी विचार करण्यात येईल. व पात्र ठरल्यास वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

७. एखादया व्यक्तीने गाळा मुळ गाळेधारकाकडुन गाळा खरेदी केला असल्यास तो व्यक्ती अतिरीक्त गाळयासाठी पात्र ठरणार नाही.

उपरोक्त मुद्यांच्या आधारे अनुषंगाने करावयाच्या वितरणाच्या कार्यवाही प्रमाणे वितरण प्रक्रिया राबविण्यात यावी.

सदर परिपत्रक म्हाडा संकेतस्थळ https://mhada.gov.in वर उपलब्ध राहील.

(अनिल डिग्गीकर)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
प्राधिकरण